# आजची सावित्री - किरण बेदी एक अतुलनीय शौर्यगाथा

सौ. सुषमा संगई
लघुलेखक,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती
भ्रमणभाष - ८८०५८८६३५०

**सारांश :**

किरण बेदी यांचा जन्म अमृतसर येथे ९ जून १९४९ साली झाला. दिल्ली विद्यापीठातून त्यांनी कायद्याची पदवी घेतली. आयआयटी दिल्ली या ठिकाणाहून पीएच.डी. पदवी संपादन केली. पोलीस दलातील त्या पहिल्या आयपीएस अधिकारी.

त्याच्या कार्यकाळात त्यांनी जे जे काम केले ते अनन्यसाधारण असे होते. कायमच त्यांनी नवनवीन आव्हाने स्विकारली आणि जेथे जेथे त्या गेल्या तेथील अडचणी जाणून घेतल्या प्रसंगी त्यांनी प्रवाहा विरूध्द जाऊन योग्य ते निर्णय घ्यायला त्या कधीच डगमगल्या नाहीत. गुन्हेगारी नियंत्रणाचे काम त्यांनी केले. त्यांनी त्यांची तत्वे कधीच सोडली नाहीत. पोलीस खात्यात असूनही प्रामाणिकपणे, माणुसकीने संवेदनशीलता जपली नी एकूणच सुधार कार्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांनी त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत दाखविलेले धाडस, त्यांनी केलेले काम, घेतलेले निर्णय पाहून आजच्या काळातीलही सावित्रीच आहे हे जाणवते.

पुरूष प्रधान समजल्या जाणाऱ्या क्षेत्रात एक स्त्री - डॉ.किरण बेदी आयपीएस अधिकारी यांनी केलेल्या कार्याचा अभ्यास या शोधनिबंधासाठी चरित्रात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे.

**प्रस्तावना :**

डॉ. किरण बेदी या प्रकाशलाल-प्रेमलता पेशावरिया यांची दुसरी कन्या. लहानपणापासूनच क्रीडा व शिक्षण यांची त्यांना आवड होती. आई वडीलांच्या प्रत्येक पैशाचा सदुपयोग करायचा हा त्यांचा प्रमाणिक प्रयत्न असे. लहानपणापासून प्रामाणिकपणा, परिश्रम करण्याची तयारी, जिद्द त्यांच्या मध्ये होती. टेनिस त्यांचा आवडता खेळ. एनसीसीमध्ये त्या हिरीरीने भाग घेत. नाटक, क्रीडा, वादविवाद स्पर्धा अशा कुठल्याही स्पर्धेत भाग घेण्याची संधी त्यांनी सोडली नाही. इयत्ता नववीत असताना स्वतःला पाहिजे असलेली शाळा निवडण्याचा पहिला निर्णय त्यांनी घेतला. मॅट्रिक परीक्षा झाल्यानंतर अमृतसर येथील गर्व्हनमेंट कॉलेज फॉर वुमन येथे प्रवेश घेतला. राज्यशास्त्र आणि तत्वज्ञान हे त्यांचे आवडते विषय होते. एनसीसी त्यांचे आवडीचे क्षेत्र. यामुळेच पुढे त्या पोलीस दलात आल्या. कॉलेजमध्ये असतनाच डॉ. किरण बेदी यांनी निश्चय केला होता की, भारतीय स्त्री म्हणून असे काही करेन की सर्वांना आदर्श वाटेल. कॉलेजमध्ये शिकत असताना त्या टेनिस या खेळामध्ये हिरीरीने भाग घ्यायच्या. टेनिस खेळामध्ये राष्ट्रीय विजेतेपद तसेच आशियायी

विजेतेपद देखील त्यांनी मिळविले. टेनिसया खेळा मुळे आयुष्यात डावपेच कसे आखावे हे समजले. डॉ. बेदी म्हणतात, वयाच्या १३ व्या वर्षांपासून ३० वर्षापर्यंत त्या टेनिस स्पर्धेत खेळल्या. सन १९७२ मध्ये आयपीएस अधिकारी पदावर नियुक्त झालेली पहिली स्त्री, हा सन्मान त्यांना मिळाला. आयपीएस अधिकारी पदावरून काम करीत असताना अनेक निर्णय त्यांनी घेतले. हे निर्णय घेताना त्या कधीच आपल्या निर्णयापासून ढळल्या नाहीत. पुरूषांचे क्षेत्र म्हणून गणल्या जाणाऱ्या या क्षेत्रात एका महिलेने केलेले काम देश-विदेशात पोहोचले. त्यांचे निर्णय, त्यांचे सुधारकार्य पाहण्याकरिता देश विदेशातील अधिकारी भारतात येत होते. अनेक वेळा त्यांच्या बदल्या झाल्या पण त्यांनी त्यांचे काम तितक्याच जोमाने व हिरीरीने चालू ठेवले. अनेक प्रश्नांना त्यांनी निडरपणे उत्तरे दिली. हक्कासाठी त्यांचा लढा त्यांनी कायम ठेवला. कायमच त्यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि त्याचे काटेकोर पालन केले. त्यांनी अनेकांची प्रस्थापित हुकूमत कधीही मानली नाही. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी केलेले काम हे सर्व भारतीयांसाठी गौरवास्पद आहे.

**डॉ. किरण बेदी यांनी केलेले कार्य :**

डॉ. किरण बेदी यांच्या सुरवातीच्या काळात म्हणजे ५ नोव्हेंबर १९७९ मध्ये राजपथावर एक घटना घडली. अनेक शिखांचा मोर्चा राष्ट्रपती भवनावर येत होता. हातात तलवारी व आक्रमक आरोळ्यांनी वातावरण युध्दमय झाले हाते. शिखांचे संतसमागम प्रसंगी गोळीबार झाला. त्यांच्या निदर्शनार्थ हा मोर्चा होता. मोर्चातील अकालींना थोपवण्यासाठी डॉ. बेदी स्वतः प्रयत्न करीत होत्या. परंतू अकालींनी उलट पोलींसावर हल्ला केला. यामध्ये स्वतः लाठी हल्ला करून असामान्य शौर्य दाखविले. शीख निर्दशकांचाही आवेश ओसरला पोलीस म्हणून डॉ.बेदी यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांना १० ऑक्टोबर १९८० मध्ये पोलीस मेडल फॉर गॅलंट्रीया पुरस्काराने गौरवान्वित केले.

सन १९८२ मध्ये दिल्ली या ठिकाणी भरविण्यात आलेल्या आशियाई स्पर्धांच्या वेळी डॉ. बेदी यांनी डीसीपी वाहतूक म्हणून काम केलेले कार्य वाखाणण्या जोगे होते. दिल्ली शहरात चुकीच्या पार्किंगमुळे वाहतूक समस्या होत्या. सकाळी ६ ते सायंकाळी ७ पर्यंत त्या ऑफिसमध्ये काम करीत असत. रात्री ८ नंतर त्यांच्या ॲम्बॅसिडर मधून रस्त्यांवर फेर फटका मारायच्या. सिग्नलच्या वेळा तपासायच्या, चुकीची दुरूस्ती करायच्या, वाहतुकीच्या नियमांचा भंग झाल्यास कारवाई करायच्या यामुळे त्यांचा दरारा निर्माण झाला.

डॉ.बेदी यांनी त्याचा अभ्यास करून नियमबाह्य पार्क केली जाणारी वाहने उचलून पोलीस स्टेशनला पाठविण्यासाठी अनेक ठिकाणी क्रेन्स ठेवल्या होत्या. त्यामुळे डॉ. बेदींना 'क्रेनबेदी' या नावाने ओळखले गेले. आशियाई स्पर्धांच्या वेळी अवाढव्य वाहतूकही सुरळीत झाली.

डॉ. बेदी यांची १९९३ मध्ये तिहार तुरूंगाच्या निरीक्षकपदी नियुक्ती झाली. खरंतर

शिक्षा म्हणून त्यांना हे काम दिले गेले. परंतू डॉ. बेदी यांनी याकडे एक संधी म्हणून पाहिले. भारतातील सर्वात मोठे तुरूंग म्हणून 'तिहार तुरूंग' प्रसिध्द होते. येथे ९० टक्के कैदी हे पक्के कैदी होते. तर १० टक्के कैदी हे कच्चे कैदी होते. या तुरूंगात ८००० पेक्षा जास्त कैदी होते. सुरूवातीला प्रथम डॉ. बेदी यांना दिलेल्या कामाबद्दल त्यांना थोडी भीती वाटत होती. परंतु त्यांनी कैद्यांचा अभ्यास केला. त्यांच्याकडून गुन्हे घडलेचा अभ्यास केला. यावर माणुसकीच्या दृष्टीने विचार केला. चुकलेल्या कैद्यांना योग्य रीतीने मार्गावर आणण्याचे काम त्यांनी केले. तुरूंग सुधारण्यासाठी अतोनात श्रम घेऊन पोलिसांचे ही समुपदेशन केले. त्यांच्या मध्ये सकारात्मक बदल केले नी आत्मविश्वास वाढविण्यासाठी प्रयत्न केले. कैद्यांचेही समुपदेशन केले. मानवतावादी दृष्टिकोनातून त्यांनी कैद्यांच्या वृत्तीमध्ये सुधारणा घडवून आणल्या. अनेकजण लिहायला, वाचायला लागले, विपश्यना शिबीरे त्यांनी घेतली. मनावर ताबा कसा ठेवायचा ते या शिबीरातून कैद्यांना शिकविले. अनेकांनी तुरूंगात राहून काही कौशल्य शिक्षण घेतले. डॉ.बेदी यांनी तिहार तुरूंगाचे एका आश्रमात रूपांतर केले. संयुक्त राष्ट्र संघात पहिला महिला पोलिस सल्लागार होण्याचा सन्मान डॉ. बेदी यांना मिळाला. त्यांना त्यांच्या कामाबद्दल अनेक पुरस्कार मानसन्मान प्राप्त झाले.

१. राष्ट्रपतींच्या हस्ते पोलिस शौर्य पदक देण्यात आले.
२. अंमली पदार्थ सेवन प्रतिबंध क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल एशिया रिजन अवॉर्ड प्राप्त झाला.
३. फिलिपिन्सच्या रेमन मॅगेसेस फाऊंडेशनचा पुरस्कार प्रथमच आशियातल्या एका पोलिस अधिकाऱ्यास प्राप्त झाला. पोलिस अधिकाऱ्यास जगात प्रथम शांततेचा पुरस्कार दिला गेला.
४. मद्य, मादक पदार्थ, एड्स, आणि तंबाखू सेवन या विरूध्द उभारलेल्या मोहिमेबद्दल इंटरनॅशनल इक्यूमेनिकल फॉर्म या असोसिएशन ऑफ ख्रिश्चन कॉलेज ऍण्ड्युनिव्हर्सिटीज तर्फे आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त. मानवकल्याण स्त्रियांचे अधिकार, निधर्मी मूल्यांचा पुरस्कार केल्याबद्दल यू एस अमेरिकन फेडरेशन ऑफ इंडियाच्यावतीने सन १९९९ मध्ये प्राईड ऑफ इंडिया या पुरस्कारने सन्मानित.
५. राष्ट्रीय विकासात महत्वाचे योगदान केल्याबद्दल आयआयटी दिल्ली अल्मनी असोसिएशनने प्रथमच १९९९-२००० चा पुरस्कार दिला.
६. वुमन ऑफ द इयर अवॉर्ड (इटली)
७. भारतातल्या न्यायाची गुणवत्ता लक्षणीयरित्या सुधारण्यास कराणीभूत ठरलेल्या कृतींबद्दल मॉरिसन टॉमगिशॉफ अवॉर्ड (यूएसए)
८. पोलिस कल्याण कार्याबद्दल चिन्मय अवॉर्ड २००३ युएसए.
९. युनिव्हर्सिटी ऑफ साऊथ फ्लोरिडा आणि फेडरेशन ऑफ इंडियन अमेरिकन्स यांच्या तर्फे पॉवर ऑफ द डे डिकेट प्रोफेशनल अवॉर्ड २००३
१०. सन २००४ साली संयुक्त राष्ट्र संघाच्या पदकाने सन्मानित.

११. सामाजिक न्यायासाठी २००५ पक्ष मदर तेरेसा पुरस्कार.

त्यांनी त्यांच्या कामाव्यतिरिक्त आवड म्हणून इतरही कार्य केले.

यामध्ये 'नवज्योती' ची स्थापना १९८७ साली केली. घरोघरी जाऊन व्यसनाधीन व्यक्तींना मोफत उपचार दिले. झोपडपट्टीतल्या मुलांसाठी पाळणाघरे, शाळा सुरू केल्या, स्त्रियांसाठी साक्षरता केंद्रे आणि व्यावसायिक शिक्षण सुरू केले. त्यांच्याप्रमाणे इंडिया व्हिजन फाऊंडेशन अंतर्गतही त्यांनी अनेक कामे केली.

त्यांच्या जबाबदारी बरोबरच त्यांनी अनेक पुस्तके लिहिली व वृत्तपत्रात स्तंभ लेखन केले.

**समारोप :**

स्त्रियांच्या विकासामध्ये शिक्षणाचा फार मोठा वाटा आहे.

सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा त्या काळी केलेला प्रसार जेव्हा स्त्री घराबाहेर पडू शकत नव्हती अशा काळात केलेल काम मोलाचे आहे. पुरूषांची समजली जाणारी क्षेत्रे आज स्त्रिया पादाक्रांत करून तिच्या अंगी असलेले उपजत गुण प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, तत्परता आणि समर्पण या वृत्तींमुळे अतुलनीय कार्य डॉ.बेदी यांनी केली आहे. डॉ.किरण बेदी या अनेक स्त्रियांचे प्रेरणास्थान आहेत व ठरतील. आलेल्या संकटांना सामोरे जाऊन आपली तत्व न सोडता समाजाचे व राष्ट्राचे काम एक कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून त्यांनी बजावले व संपूर्ण भारतभर नव्हे तर विदेशातही कार्याचा आदर्श ठसा उमटविला.

**संदर्भग्रंथ :**

१. आयडेअर- किरण बेदी अनुवाद आशा कर्दळे, मेहता पब्लिशिंग हाऊस.
२. मजल दर मजल - किरण बेदी, मेहता पब्लिशिंग हाऊस.
३. व्हॉट व्हेंट रॉंग ऍण्ड व्हाय - किरण बेदी, मेहता पब्लिशिंग हाऊस.

***